# उल्हासनगर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : २५/१०/२०२४

## प्रेसनोट

उल्हासनगर महानगरपालिका दिव्यांग कल्याणकारी योजना विभागाच्या वतीने शहरातील दिव्यांग लाभार्थ्यांना दर महिन्याला १० तारखेपर्यंत प्रत्येकी २२०० /- प्रोत्साहन अनुदान (पेन्शन) दिले जाते. मात्र दिवाळी सन हा पुढील महिन्याच्या पहिल्याच आठवडयात येत असल्याने दिव्यांगाचे प्रोत्साहन अनुदान दिवाळीपूर्वी मिळावे यासाठी विविध दिव्यांग संघटनानी मा.आयुक्त ,अति.आयुक्त्, सहायक आयुक्त्, मुख्य.लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक व दिव्यांग विभागप्रमुख यांच्याकडे विनंती केली होती. त्यांस अनुसरून आज दिनांक २५/१०/२०२४ रोजी सर्व दिव्यांग लाभार्थ्याच्यां खात्यामध्ये सुमारे रु.४४,५०,६००/- (चौरेचाळीस लाख पन्नास हजार सहाशे मात्र) इतके प्रोत्साहन अनुदान जमा करण्यात आलेले आहे.

याबाबत सर्व दिव्यांग संघटनानी महानगरपालिका आयुक्त श्री. विकास ढाकणे यांचे आभार मानले असल्याचे दिव्यांग कल्याणकारी योजना विभागाचे विभागप्रमुख श्री राजेश घनघाव यांनी सांगितले आहे.

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका
प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
   - सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.